www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 223 वा रविवार दि. 27 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## डम्परखाली चिरडून कामगाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

सिडको महामंडळाच्या घोट गावाशेजारील नागरी घनकचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये एका कामगाराचा डम्परच्या चाकाखाली चिरडून मृत्यू झाल्याची घटना घडली. मृत कामगाराचे नाव धर्मा बाळाराम पाटील असे आहे. धर्मा हे 55 वर्षांचे होते.

सिद्धी करवले गावात राहणारे धर्मा यांचा मुलगा राकेश याने तळोजा पोलिसांत याविषयी तक्रार नोंदवली. तक्रारीमध्ये सिडकोच्या नागरी घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पामध्ये सकाळी डम्पर क्रमांक एम.एच. 46 सीयू 2672 या डम्परचालकाने मागच्या दिशेला डम्पर चालवताना हॉर्न दिला नाही, तसेच आवाजही दिला नाही. यामुळे या डम्परच्या मागील चाकाखाली घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात काम करणाऱ्या धर्मा यांच्या अंगावरून डम्पर गेला. या घटनेनंतर डम्परचालक पसार झाला. डम्परचालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला
==============

## मुलीची हत्या करून महिलेची आत्महत्या

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

तळोजा परिसरातील पेठाली गावात राहणाऱ्या एका 30 वर्षीय महिलेने चार वर्षांच्या मुलीला उशीने गुदमरून मारले. त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली.

सोनम अभिषेक केणी असे मृत महिलेचे नाव आहे. सोनम या मुलगी देवांशी हिला घेऊन वरच्या खोलीत झोपण्यासाठी गेल्या, मात्र सायंकाळी पावणेसहा वाजले तरी त्यांनी दरवाजा न उघडल्याने घरातल्या मंडळींना संशय आला. खोलीत देवांशी मृतावस्थेत आढळली आणि सोनम यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे पोलिसांनी पाहिले. मागील वर्षी एक वर्षाच्या बालिकेचा मृत्यू झाल्यापासून सोनम तणावात असल्याने त्यांनी हे पाऊल उचलले असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत हे अधिक तपास करत आहेत.

## पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती जिल्ह्यात प्रथम तर कोकण विभागात सहावा क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**: बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्प 2023 - 24 या वर्षाच्या क्रमवारीत राज्यातून पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती १११ व्या क्रमांकावर आली असून कोकण विभागात सहावा क्रमांक तर रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आली आहे.

राज्यात जागतिक बँक अर्थसहाय्यीत बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्प अंतर्गत बाजार समिती यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी 2021- 22 पासून पणन संचालनालया मार्फत प्रसिद्ध करण्यात येते. राज्यातील 305 बाजार समितीची 2023 - 2024 या वर्षाची वार्षिक क्रमवारी पणन संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्या द्वारे जाहीर करण्यात आली. या गुणांकनात पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीला पायाभूत सुविधा व इतर सेवा सुविधा, आर्थिक निकष, वैधानिक कामकाज, इतर निकषांमध्ये चांगले गुण प्राप्त झाले आहेत. भविष्यात बाजार समित्यांसमोर मोठी स्पर्धा व आव्हाने उभे राहणार आहेत. आव्हाने व स्पर्धा लक्षात घेता समितीच्या कामकाजात आणखी काय सुधारणा करता येईल याबाबत संचालक मंडळ विचार करत आहे. या क्रमांकामुळे पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे विविध स्तरातून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.




# दहशतवादाचा तीव्र निषेध
# पनवेलमध्ये विराट मशाल मोर्चा








**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड व अमानुष दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा, पनवेल शहराच्या वतीने एक विराट मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रभक्तीचा धगधगता ज्वालामुखी बनलेला हा मोर्चा संपूर्ण परिसरात दहशतवादाविरोधात जागृतीचा संदेश ठरला. काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर झालेल्या अमानुष दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी आणि मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्यावतीने पनवेल परिसरातील खांदा कॉलनी ते नवीन पनवेल दरम्यान विराट मशाल मोर्चा आयोजित करण्यात आला होता. आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मशाल मोर्चात पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह, युवक, युवती, शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला होता. यावेळी "भारत माता की जय" घोषणांनी परिसर देशभक्तीने निनादला होता. तर पाकिस्तानचा झेंडा जाळत "दहशतवाद मुर्दाबाद", "पाकिस्तान मुर्दाबाद" अशा घोषणा देत घोषणांमधून केवळ संताप नव्हे, तर दृढ निर्धाराचे प्रतिबिंब उमटले. हा मोर्चा निषेधाच्या पलीकडे जाऊन, केंद्र सरकारच्या दहशतवादविरोधी कठोर आणि निर्णायक धोरणांना जाहीर पाठिंबा दर्शवणारा ठरला. देशाच्या एकात्मतेला हादरा देणाऱ्या प्रयत्नांचा खात्मा करण्यासाठी सरकारच्या पाठीशी अखंडपणे उभे राहण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. हल्ल्यात हुतात्मा झालेल्या निष्पाप पर्यटक आणि शहीद जवानांप्रती श्रद्धांजली अर्पण करताना, त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात संपूर्ण देश सहभागी असल्याचे भावनिक शब्दांत व्यक्त करण्यात आले. या मोर्चात भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितिन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी महापौर डॉक्टर कविता चौतमोल, नवीन पनवेल शहर मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, सुशीला घरत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, जगदीश घरत, ज्योती देशमाने, भीमराव पोवार, किशोर चौतमोल, शिवाजी भगत, गोपिनाथ मुंडे, सय्यद अकबर, रुपेश नागवेकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, उपाध्यक्षा शिवानी घरत, रोहित जगताप, युवामोर्चा खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील, गौरव कांडपिले, प्रीतम म्हात्रे, राकेश भुजबळ, कोमल कोळी, देवांशु प्रभाळे, अक्षय सिंग, रोहित कोळी, शुभम कांबळे, श्रवण घोसाळकर, मोतीलाल कोळी, यश भोईर, राजू महापूरकर, वरुण डंगर, कुलबीर सिंग, आशा मुंडे, रामनाथ,पाटील, युवराज बेडसे, विश्वास काथारा, उदय काथारा, यांच्यासह पनवेलकर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले विचार मांडताना म्हंटले कि, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ३७० कलम रद्द करून कश्मीरच्या विकासाला चालना दिली गेली. जगभरातले पर्यटक काश्मीरचे सौंदर्य पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात येऊ लागले. आणि अशातच पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली. निष्पाप पर्यटकांचा यामध्ये दुर्दैवी अंत झाला. त्यामध्ये आपल्या पनवेलचे दिलीप देसले यांनाही गोळ्या झाडून मारण्यात आले. धर्म विचारून हिंदू धर्माच्या लोकांची हत्या करणाऱ्या या घटनेचा मी निषेध करतो. ते पुढे म्हणाले कि, आपल्याला या पाकिस्तानच्या बद्दल चीड असणारे जे जे प्रसंग आहेत ते मनात साठवून ठेवले पाहिजेत आणि त्या प्रसंगाची आठवण प्रत्येक क्षणाला आपल्याला झालीच पाहिजे. देश बांधवांची अशा पद्धतीने हत्या करणाऱ्या विश्वासाने गळा घोटणाऱ्या शक्तींना मी कुठे भर देत नाहीये ना याचा विचार आपल्याला प्रत्येक दिवशी प्रत्येक क्षणाला करावा लागणार आहे, असेही आमदार **पान २ वर**



भागवत अहिरे यांची पनवेल प्रेस क्लब संस्थेचा सचिव पदी निवड झाल्या बद्दल हार्दिक अभिनंदन
( छायाचित्र दैनिक युवक आधार )

## पनवेल वाहतूक पोलिसांनी अपघात टाळण्यासाठी रस्त्यावर पडलेले खड्डे घेतले भरुन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**



पनवेल वाहतूक शाखेच्या पोलिसांनी अपघात टाळण्याच्या उद्देशाने रस्त्यावर पडलेले खड्डे भरुन घेतल्याने त्यांच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शिवशंभो नाका नो एंट्री पॉइंट वरील शहीद भोसले पेट्रोल पंप कडे जाणाऱ्या रस्त्यावरील पडलेले खड्डे भरून घेण्याचे काम वाहतूक नियमन करत व सदर ठिकाणी अपघात होऊ नये म्हणून पनवेल वाहतूक पोलीस हवालदार युवराज येळे व अमीर मुलाणी यांनी स्वतः करून घेतले. यामुळे आगामी काळात होणारे अपघात टळणार असल्याने वाहनचालक व नागरिकांनी वाहतूक पोलिसांचे आभार व्यक्त केले आहे.






द•ख•ल

## श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी महोत्सव भक्ती भावाने संपन्न

दैनिक युवक आधार निफाड
प्रतिनिधी राहुल कुलकर्णी

शनिवार दि.२६ रोजी निफाड येथील स्वामी समर्थ केंद्रात पुण्यतिथी निमित्ताने स्वामींच्या मूर्तीला महाअभिषेक करण्यात येऊन महानैवेद्य आरती करण्यात आली. स्वामी समर्थ महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पुण्यतिथी उत्सवानिमित्त मंदिरावर भव्य विद्युत रोषणाई केलेली होती. पुण्यतिथी निमीत्ताने अखंड नामजप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहा मध्ये १२७ स्त्री पुरुष सेवेकर्यांनी श्री गुरुचरित्र या ग्रंथाचे पारायण केले.सप्ताह काळात नैमित्तिक होमहवन ,याग घेण्यात आले.श्रीपाद वल्लभ चरित्र,श्री स्वामी चरित्र,दुर्गा सप्तशती,मल्हारी महात्म्य आदी ग्रंथाचे वैकक्तिक व सामुदायिक पारायणे तसेच नामजप करण्यात आले.

वि दा. व्यवहारे यांनी सर्व भाविकांना मार्गदर्शन केले.भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.दिवसभर अनेक भाविकांनी केंद्रात येऊन दर्शन घेतले.





## पनवेल महानगरपालिका व एल.ई. महाविद्यालय, कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरां अंतर्गत स्वच्छता मोहिम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका आणि के.एल.ई. महाविद्यालय, कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा कार्यक्रमांतर्गत 'स्वच्छता मोहिमेचे आयोजन दिनांक 25 एप्रिल रोजी करण्यात आले. पर्यावरण संवर्धन करण्याच्या दृष्टीने माझी वसुंधरा अंतर्गत उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, प्राचार्य डॉ.विजय डी. मेंढुलकर ,एनएसएस कार्यक्रम अधिकारी शितल घार्गे, प्रा. विशाल छावरिया, प्रा.विद्या गोसावी , प्रा. दिपिका घाडगे , प्रा. सतिश सोनटक्के उपस्थित होते. या स्वच्छता मोहिमेंतर्गत के.एल.ई. महाविद्यालय परिसरातील रस्त्यांची सफाई करण्यात आली. स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यासाठी या स्वच्छता मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वच्छता रॅली काढण्यात आली. या रॅलीत विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत व पालकांच्या माध्यमातून स्वच्छता संदेश देण्यात आला.




# महात्मा फुले महाविद्यालया मध्ये पदवीदान समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**: रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये २६ एप्रिल २०२५ रोजी पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभास महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. जे. जी. जाधव उपस्थित होते. या प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयातील पदवीधर व पदव्युत्तर स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा आपल्या प्रास्ताविकामध्ये घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व विषद करीत जीवनामध्ये यशस्वी होण्याचा कानमंत्र दिला. आजच्या युगामध्ये टिकून रहावयाचे असेल तर स्पर्धेशिवाय पर्याय नाही व कष्ट केल्याशिवाय फळ नाही. काबाडकष्ट करून शिकणारे विद्यार्थी खूप मोठी यशाची गरुड झेप घेतात. विद्यार्थ्यांनी आवडीचे क्षेत्र निवडले तर त्यांना प्रगती व यश नक्की मिळेल. आजच्या स्पर्ध्येच्या काळात केवळ शिक्षण असून चालत नाही तर विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत अंगी कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे तसेच त्यांनी आपल्या भावी आयुष्यामध्ये समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन वाटचाल करायला हवी असा मोलाचा सल्ला त्यांनी या प्रसंगी दिला. प्राचार्य डॉ.




जे जी. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी कर्मवीर अण्णांच्या जीवनचरित्रातून प्रेरणा घेतली पाहिजे. तसेच आपल्या वर्तनातून आपली विद्वत्ता सिद्ध केली पाहिजे. समाजासमोर तुमची विद्वत्ता व तुमच्यातील गुण येणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धेला न घाबरता त्याला सामोरे गेले पाहिजे. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास महेंद्र घरत,महाविद्यालयाचे उपप्राचार्य. डॉ. आर. ए. पाटील, डॉ. एन बी. पवार,वाणिज्य शाखेचे विभाग प्रमुख प्रा.जे.बी.वारघडे, विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. राजाराम पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रविण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर व प्रा. डॉ.वाय. एच उलवेकर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## नवव्या वर्धापन दिनी नऊ विजेत्यांना करणार सन्मानित

### रविवारी रंगणार ओरायन मॉलच्या वर्धापन दिन ;चार सेलेब्रिटी पाहुणे लावणार हजेरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल शहरातील एकमेव मॉल म्हणुन प्रसिद्ध असलेल्या ओरायन मॉलचा नववा वर्धापन दिन दि.27 एप्रिल रोजी रविवारी आयोजित करण्यात आला आहे.या वर्धापन दिनी नऊ विजेत्यांना ओरायन मॉलच्या माध्यमातुन विशेष आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.याकरिता मॉल प्रशासनाने आयोजित केलेल्या शॉप अँड विन कॉन्टेस्टच्या विजेत्यांची निवड तब्बल चार मराठी सेलेब्रिटी करणार आहेत.

या मराठी सेलेब्रिटी मध्ये स्मिता शेवाळे,नेहा नाईक समीर चौघुले,इशा डे आदी उपस्थित राहून पनवेलकरांशी संवाद साधणार असल्याची माहिती ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर आणि मनन परुळेकर यांनी दिली.दरम्यान नऊ विजेत्यांपैकी प्रथम विजेत्याला यमाहा फसिनो स्कुटर आणि द्वितीय विजेत्यांना आय पॅड व इतर विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. रविवारी दि.27 एप्रिल रोजी सायंकाळी 7.30 वेळी हा लकी ड्रॉ स्वतः सेलेब्रिटी विनर घोषित करणार येणार आहे.




## कोट गावचे ग्रामदैवत श्री राघोबा देवाचा दैवी कौल "पालखी मंदिरात परतेपर्यंत मंदिरातील दैवी घंटा अविरत मंदिरात हलते."

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

उरण कोट गावातील भक्ताच्या हाकेस धावणारा, नवसाला पावणारा, कोट गावचे ग्रामदैवत श्री राघोबा देव पालखी सोहळा चैत्र कृष्ण अष्टमी शके १९४७ म्हणजे सोमवार दिनांक २१ एप्रिल रोजी पालखी सोहळा चार दिवसांच्या विविध भक्तीमय व मनोरंजन पर कार्यक्रम आयोजित करुन मोठ्या दिमाखात साजरा झाला. कोट गावातील भक्तांवर कृपेची दृष्टी ठेवणारा, देवाच्या भक्तांवर कोणतेही संकट, दुख रोगराई, कोणतीही पिडा येऊ नये म्हणून संपूर्ण गावावर कोट म्हणजे संरक्षण करणारा लहान मुलांपासून ते अबालवृध्दांची श्रद्धा असणारे हे दैवत, गावातील कोणतेही शुभ कार्य असेल , गावातील वधु वर असतील, रंजलेला गांजलेल्या पामरास देवाचे आशिर्वाद घेण्यासाठी श्री राघोबा देवाच्या चरणी नतमस्तक होत असतात. पुर्वापार पुर्वजापासून अनेक पिढ्या देवावरील नितांत श्रद्धा ठेऊन कोणतेही कार्य निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी श्री राघोबा देवाची आळवणी केली जाते. दरवर्षी मोठ्या भक्तीभावाने व जल्लोषात हा राघोबा देव पालखी सोहळा साजरा केला जातो. यावर्षी तर ५० तास अविरत रात्रंदिवस



हा पालखी सोहळा साजरा झाला. ५० तास देवाच्या श्रद्धेने १२० किलो वजनाची पालखी ५० तास गावातील लहान मोठ्या भक्तांनी मोठ्या उत्साहाने न थकता खांद्यावर नाचवली. कारण हि एक श्री राघोबा देवाची दैवी शक्ती आहे, भक्ती आहे कारण श्री राघोबा देव यावेळी पालखी त बसून गावातील प्रत्येकाच्या घरी जाऊन त्यांना आशिर्वाद व दर्शन देत असतो. यावेळी प्रत्येक भक्त तल्लीन होऊन पालखी सोबत गुलाल उधळीत,नाचत, वाद्यांच्या सुरात हि पालखी यावर्षी ५० तास गावात फिरली. श्री राघोबा देवाची आणखीन एक शाश्वती म्हणजे देवाची पालखी गावात फिरत असताना देव हा पालखीत स्थानापन्न असताना देवाच्या मंदिरात १९३० साली जी घंटा मोरा येथील कोळी बांधवाने देवाच्या चरणी भेट दिली हि घंटा पालखी मंदिराच्या बाहेर पडली की, पालखी पुन्हा मंदिरात परत येईपर्यंत अविरत रात्रंदिवस हलत असते. या घंटेचे सुक्ष्म निरीक्षण केले तर हि घंटा सतत न थांबता सूक्ष्मपणे हलत असते. येथील गावकऱ्यांना हि घंटा हलते म्हणजे हा एक देवाचा कौल आहे असे मानले जाते. देवाचा आशीर्वाद आहे, अशी प्रचीती प्रत्येक भक्तास आली आहे. या घंटेलाही आकर्षक सजावट केली जाते. श्री राघोबा देवाची आशिर्वाद रूपी प्रचीती अनेक भक्तांना अनुभवास आली आहे म्हणून तर कोटगावच्याच नाही तर पंचक्रोशीतील अनेक भक्तांची नितांत श्रद्धा श्री राघोबा देवावर आहे. म्हणून तर संकटात, दुखात, शुभ कार्याच्या वेळी देवाची आळवणी केली जाते. देवाला आर्ततेनं हाक मारली जाते. आणि वर्षातून एकदा होणारा हा पालखी सोहळा मोठ्या संख्येने उपस्थित राहून, नेत्रदीपक सजावट करून देवाच्या मंदिरात फुलांची आरास विद्युत रोषणाई करून, गोड प्रसाद नैवेद्य दाखवून, गावातील सासुरवाशीण, माहेरवाशीण, नोकरी व्यवसाय निमित्ताने गावात वास्तव्यास नसले तरी श्री राघोबा देवाच्या पालखी सोहळ्यासाठी सर्व ग्रामस्थ हजर राहून दरवर्षी स्मरणात राहील, आणि पुढील पालखी सोहळ्यासाठी हा आनंद कायमस्वरूपी टिकून राहिल असा हा सोहळा साजरा केला जातो.

## नागलोक असोसिएशन पुणे यांच्या वतीने सन्मान मधु ताराचा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

दिनांक 26 एप्रिल 2025 रोजी नागलोक असोसिएशन पुणे यांच्या आयोजनातून राष्ट्रपिता थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती महोत्सव तसेच स्नेह मेळाव्याचे आयोजन *नटसम्राट निळू फुले नाट्यगृह पिंपळे गुरव नवी सांगवी पुणे येथे उत्साहात हजारो भीम अनुयायांच्या उपस्थित पार पडले. *या वेळी महाराष्ट्रभर आरोग्य दिव्यांग रोजगार शिक्षण यांच्या वर कार्य करणाऱ्या मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष श्री नितीनजी शिंदे यांना सन्मानित केले गेले. *मधु तारा सोबत जोडल्या गेलेल्या सरिताताई चौधरी आणि नागलोक असोसिएशनचे श्री चौधरी सर यांनी मधु तारा प्रमुखांना आमंत्रित केले. या प्रसंगी आपल्या दिमाखदार भाषणात मधु ताराचे राज्य भर चालत असलेल्या कार्याची माहिती देत नागलोक असोसिएशन यांच्या लोकपयोगी प्रबोधनाच्या कार्यक्रमाचे अभिनंदन मधु तारा प्रमुखांनी केले. आणि मधु ताराला




आमंत्रित करून सन्मानित केल्या बद्दल सर्व असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# अतिरेक्यांचा निषेध करण्यासाठी करंजाडे मध्ये बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद,मृत पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

जम्मू काश्मीर पहलगाम येथे २२, एप्रिल रोजी पर्यटकावर अतिरेक्यांनी केलेल्या गोळीबारात मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व सदर घटनेचा निषेध करण्यासाठी ग्रामपंचायतीने शुक्रवार दिनांक २५,एप्रिल रोजी करंजाडे बंद जाहीर केला,दिवसभर संपूर्ण करंजाडे गाव,शहर मधील नागरिकांनी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला,देशावर येणाऱ्या आपत्ती संकटाला करंजाडे जनतेची देशभक्ती एकता दिसून आली. सायंकाळी करंजाडेतील नागरिकांनी एकत्र येत मृत प्रत्येकांना सायंकाळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत उपस्थितांनी आपल्या मनोगतातून निषेध व्यक्त केला. दहशतवाद संपवण्यासाठी पंतप्रधान व सरकारच्या पाठीमागे जनता असून अतिरेक्यांचे निर्मितीचे केंद्रबिंदू असलेले पाकिस्तान व अतिरेक्यांवर कठोरात कठोर कारवाई ची मागणी करण्यात आली,पाकिस्तानची कोंडी केल्याप्रकरणी जनतेने मोदींचे आभार मानले असून भविष्यातही पाकिस्तानची कोंडी पंतप्रधान नरेंद्र मोदी जी अजून तीव्र करतील असे भावपूर्ण श्रद्धांजली वेळी अनेकांमी मत व्यक्त केले,घरातील कर्त्या पुरुषांवर गोळीबार करून हत्या केल्याप्रकरणी सदर प्रकाराचा महिलांकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. अतिरेक्यांवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली. बंदला जनतेने




प्रतिसाद दिल्याबद्दल ग्रामपंचायतीचे सरपंच व उपस्थित नागरिकांनी जनतेचे आभार व्यक्त करत करंजाडे जनतेची एकता पुढेही दिसून येईल अशा प्रकारचा निर्धार व्यक्त केला. सकल हिंदु समाज व ग्रामपंचायत करंजाडे तर्फे आयोजीत बंद व श्रद्धांजली कार्यक्रम. ग्रामपंचायत तर्फे सरपंच मंगेश दादा शेलार, उपसरपंच सागरजी आंग्रे, सदस्य सुरज शेलार, नंदु भोईर उपस्थित होते. भारतीय जनता पार्टी तर्फे भाजपा विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, भाजपा शहर अध्यक्ष संदेशजी पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस चे जयसिंगजी पाटील, तसेच भाजपा सरचिटणीस प्रथमेशजी पुंडे, भाजपा युवा मोर्चा व शिवप्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजितजी पाटील, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सुषमा मयेकर, विश्व हिंदु परिषद अध्यक्ष प्रदीपजी गावडे, सिरवी समाज चे विनोद सिरवी, उत्तर भारतीय अध्यक्ष सुरज गुप्ता, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे विक्रमजी पवार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, एकता मित्र मंडळ, नव वर्ष स्वागत समिती, संत सेवा सांप्रदायिक मंडळ, श्रीराम सेवा मंडळ व इतर सामाजिक संगठनाचे कार्यकर्ते मानवेंद्र जायसवाल, बाबासाहेब भोसले, योगेश शिंदे, सुभाष राळे तसेच महिला कार्यकर्त्या सुचित्रा पाटील, ज्योती तातारे, रश्मी गुप्ता, कांता गायकवाड, प्रियांका ठाकूर व अन्य कार्यकर्त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,एकता मित्रअनेक कार्यकर्ते यांनी हे भावपूर्ण श्रद्धांजली उपस्थिती दर्शवली.

## दहशतवादाचा तीव्र निषेध पनवेलमध्ये विराट मशाल मोर्चा

**पान १ वरून** प्रशांत ठाकूर म्हणाले. पहलगाम येथे झालेला हल्ला हा फक्त मानवतेवर झालेला हल्ला नसून तो हिंदू धर्मावर झालेला हल्ला आहे आणि म्हणून आज भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने मशाल मोर्च्याचा आयोजन करण्यात आले होते. ही मशाल सतत आपण पेटती ठेवली पाहिजे असे मत यावेळी भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड चे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी व्यक्त केले. दरम्यान माजी नगरसेवक एडवोकेट प्रकाश बिनेदार यांनी आपल्या भावना व्यक्त करत असताना म्हणाले नवीन पनवेल येथील दिलीप देसले यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या निवासस्थानी काल लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट दिली आम्ही त्यांच्यासोबत होतो . माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी देसले कुटुंबीयांना कोणतीही मदत लागल्यास माझ्या घराचे दरवाजे दिसले कुटुंबीयांसाठी कायम उघडे असतील असे आश्वासित केल्याचे नमूद केले.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सिम्बॉल ऑफ नॉलेज फाउंडेशन निफाड येथील अंगणवाडीला नवीन फर्शी बसविण्यात आली

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**

**निफाड :-** गायत्री नगर येथे अंगणवाडीची फर्शी पुर्णपणे खराब झाली असून त्या अंगणवाडीत लहान मुलं मुली येत असतात. तरीदेखील देखील संबंधित अधिकारी किव्हा नगरसेवक यांचे या अंगणवाडी कडे लक्ष देण्यात आले नाही.

अंगणवाडीमध्ये फर्ची फुटेल असल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना बसण्यास पुरेशी जागा होत नसल्यामुळेअश्या बिकट परिस्थितीत मुलं तिथे शिकत होते. हे सिम्बॉल ऑफ नॉलेज फॉउंडेशन च्या लक्षात आल्यावर संस्थेचे अध्यक्ष राकेश निकाळे व उपाध्यक्ष दादाराव काऊतकर यांनी अंगणवाडीला भेट दिली असता नवीन फर्शी बसऊन देण्याचे आश्वासन दिले व डॉ बाबासाहेब आंबेडकर



यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधुन नवीन फर्शी बसविण्यात आली, असून सिम्बॉल ऑफ नॉलेज या संस्थेने १०००० रुपये रोख स्वरूपात देण्यात आले असून यात दानवीर व्यक्तीने मदत केली व त्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष दादाराव काऊतकर यांनी फर्शी बसवण्याचा १५००० रू.खर्च स्वतः केला व आपले समाजसेवेचे कार्य चालु ठेवले. या कार्याला संपूर्ण खर्च सर्व मिळून २५००० रुपये करण्यात आला. यात सिम्बॉल ऑफ नॉलेज फाउंडेशन ही महापुरुष यांच्या विचारांवर काम करत असते.

संस्थेचे सर्व पदाधिकारी सामाजिक कार्यक्रम असो किव्हा मदत असो नेहमीच पुढाकार घेत असतात.त्याप्रसंगी अध्यक्ष राकेश निकाळे, उपाध्यक्ष दादाराव काऊतकर, सचिव प्रेम वाघ, खजिनदार विनोद गायकवाड ,सहसचिव प्रवीण कोळी, विक्रम आढाव, सदस्य सुनील साळवे दादाराव पंडित मार्गदर्शक भन्ते विनयप्रिय उपस्थित होते.

सिम्बॉल ऑफ नॉलेज एक सामाजिक संस्था आहे या संस्थेमार्फत आम्ही विविध कार्यक्रम राबवत असतो. तसेच कुठेही अन्याय अत्याचार झाला, किव्हा जनतेला कसलीही मदत लागली तर सिम्बॉल ऑफ नॉलेज संस्था नेहमी मदतीला धावून येणार असं संस्थेचे अध्यक्ष राकेश निकाळे यांनी सांगितलं व तसेच उपाध्यक्ष दादाराव काऊतकर व सचिव प्रेम वाघ खजिनदार विनोद गायकवाड यांनी गरीब मुलांना आर्थिक मदत करणाचे आश्वासन दिले..

## तीन वाहनांच्या अपघातात तीघे जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

**मुंबई -** पुणे महामार्गावर पुणे लेनवर किमी ९.१०० येथे २५ एप्रिल रोजी सकाळी पावणे पाचच्या सुमारास कोन गावाजवळ झालेल्या अपघातात तीघे जण जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एच 12 डब्ल्यू जे 8707 वरील चालक शिवम रामबळी गौतम (राहणार वाघोली, पुणे) हे मुंबई ते पुणे बाजूकडे पुणेलेन किमी 9/100 याठिकाणी आले. यावेळी त्यांना झोप लागल्याने बाजूने जाणाऱ्या अज्ञात वाहनास त्यांच्या कारची ठोकर लागल्याने पहिल्या लेनवर कार आडवी झाली. आणि पाठीमागून येणारा पिकअप क्रमांक एम एच 13 ईपी 0724 वरील चालक विशाल दीपक पांढरे (राहणार पंढरपूर) यांच्या गाडीला समोर आल्याने ठोकर लागून अपघात झाला. स्विफ्ट डिझायर कारमधील जखमी झालेले महिला सुस्मिता शिवनगन (वय 28 वर्षे) त्यांच्या उजव्या खांद्याला फ्रॅक्चर झालेले आहे. लोहा झिंक राजा सिंग (वय 30 वर्ष राहणार पुणे) यांचा एक दात पडलेला असून चेहऱ्यावरती किरकोळ जखमा झालेल्या आहेत. यावेळी जखमींना तात्काळ हॉस्पिटलला नेऊन ऍडमिट करण्यात आलेले आहे. पिकअप मधील इसम ओमकार पांडुरंग गुरव (राहणार पंढरपूर) यांच्या डोक्याला दुखापत झालेली असून त्यांच्यावर आय आर बी अम्बुलन्समध्ये उपचार करण्यात आले.




**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

द•ख•ल

## सणसर येथे भव्य ओपन बैलगाडी शर्यतीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



इंदापूर तालुक्यातील सणसर गावात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा भैरवनाथ यात्रेच्या निम्मित शुक्रवार दि.2 मे रोजी भव्य ओपन बैलगाडी शर्यतीचे आयोजन श्री. छत्रपती कारखाना भवानीनगर येथे मैदान तयार करण्यात आले आहे. यावर्षी गेल्यावर्षीपेक्षा बक्षीसा मध्ये मोठा बदल केला असून सर्व बक्षीस रक्कमेत वाढ करण्यात आली असून बाहेरून येणाऱ्या बैलगाडा मालकांना आपल्या गाडीचा नंबर ऑनलाईन सुद्धा लावण्यात यावा म्हणून यावर्षी ऑनलाईन बुकिंग नंबरची व्यवस्था यात्रा कमिटीमार्फत करण्यात आली असल्याची माहिती सणसर भैरवनाथ यात्रा कमिटीचे अध्यक्ष अक्षय भैय्या निंबाळकर व खजिनदार मिथुन बारवकर यांनी दिली.

यावेळी भव्य ओपन बैलगाडी शर्यत आयोजनाचे अध्यक्ष विजय भाग्यवंत,सणसर सोसायटीचे सचिव तुषार निंबाळकर,बैलगाडा मालक नितीन काटकर,इंदापूर अर्बन बँकेचे संचालक बाबा निंबाळकर,माजी अध्यक्ष नितीन नाना निंबाळकर,रोहित पाटील,माजी कार्याध्यक्ष सुमित पाटील,सागर भोईटे पै.राजाभाऊ निंबाळकर,
प्रसिद्ध झेंडा पंच भालचंद्र काटकर,अजित यादव,विशाल रायते,अक्षय निंबाळकर,
अनिरुद्ध निंबाळकर,उपस्थित होते.

## कळंबोली वाहतूक शाखेतर्फे करण्यात आले मोटार चालकांचे प्रबोधन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

कळंबोली वाहतूक शाखेतर्फे त्या परिसरातून ये-जा करणाऱ्या मोटार सायकल चालकांचे प्रबोधन करण्यात आले.
कळंबोली वाहतूक शाखेचे वपोनि हरिभाऊ बनकर यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी कळंबोली सर्कल येथे मुंबई लेनवर मोटार सायकल चालक यांना हेल्मेट घालून बाईक चालवावी, ट्रिपल सीट न घेणे, लायसन जवळ बाळगणे सिग्नल जम्पिंग, वाहन चालविताना मोबाईल फोनवर न बोलणेइत्यादी व इतर वाहतुकीच्या नियमांची माहिती देऊन प्रबोधन केले. यावेळी या उपक्रमाचे वाहन चालकांनी स्वागत केले.



## पनवेल महानगरपालिकेच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



पनवेल महानगरपालिकेच्या नवनिर्मित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे भव्य उद्घाटन रविवार, २७ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा नवीन पनवेल (पूर्व) येथील भूखंड क्र. २८१,आदई सर्कल सेक्टर-११ मधील प्रशिक्षण केंद्रात सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या उद्घाटन कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री मा. श्री. आशीष शेलार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच लोकप्रतिनिधी व भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री दिलीप वेंगसरकर, आणि मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या केंद्रामुळे पनवेल आणि परिसरातील नवोदित क्रिकेटपटूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. क्रिकेट क्षेत्रात नवीन प्रतिभावान खेळाडू घडवण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे. महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी मनपा कार्यक्षेत्रातील नागरिकांना मोठ्या संख्येने उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# एसव्हीकेएम संस्था आणि एनएमआयएमएस डीम्ड टु-बी-युनिव्हर्सिटीतर्फे

### पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहाण्यासाठी शांततेचे पालन.

**दैनिक युवक आधार**
**नवीमुंबई वार्ताहर**

श्री विले पार्ले केळवणी मंडलअंतर्गत (एसव्हीकेएम) एनएमआयएमएस-डीम्ड टु-बी-युनिव्हर्सिटीसह सर्व संस्थांनी पहलगाम, जम्मू आणि काश्मीर येथे २६ निरपराध नागरिकांचा जीव घेणाऱ्या आणि काहींना जखमी करणाऱ्या दहशतवादी हल्ल्याविषयी तीव्र दुःख आणि संताप व्यक्त केला आहे. शांततापूर्ण पर्यटकांवर करण्यात आलेल्या हिंसेच्या या भ्याड कृत्याने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आहे. या हल्ल्यातील बळी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे राहाण्यासाठी एसव्हीकेएम कॅम्पसेस आणि आठ भारतीय शहरांतील संलग्न संस्थांनी आज दोन मिनिटे शांततेचे पालन केले.




सुमारे ६५,००० विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि कर्मचारी मृतांना श्रद्धांजली वाहाण्यासाठी आणि या आव्हानात्मक परिस्थितीत शांतता व एकीचे आवाहन करण्यासाठी एकत्र आले होते. सर्व संस्था मानवता, सचोटी, शांतता आणि दयाळूपणा या तत्वांशी बांधील असून एसव्हीकेएम आणि एनएमआयएमएस अशा दहशतवादी हल्ल्यांविरोधात ठामपणे उभी आहे. आपल्या देशाच्या नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेणाऱ्या निष्पाप नागरिकांवर अशाप्रकारे हल्ला करणे अस्वस्थ करणारे व अस्वीकारार्ह आहे.

श्री. अमरिशभाई पटेल, माननीय अध्यक्ष, एसव्हीकेएम आणि चॅन्सलर, एनएमआयएमएस-डीम्ड टु-बी-युनिव्हर्सिटी म्हणाले, 'या दुःखद घटनेनं आम्हाला धक्का बसला आहे. आज एसव्हीकेएम आणि एनएमआयएमएस कुटुंब शोकाकुल देशाच्या बरोबरीने उभे आहे. मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांच्या सांत्वनात आम्ही सहभागी आहोत. जखमी झालेल्यांच्या आरोग्यासाठी आम्ही प्रार्थना करत आहोत. आपल्या समाजात दहशतवादाला स्थान नाही आणि आपण सर्वांनी एकजुटीने व निश्चयाने पुढे जायला हवे.'

आज संपूर्ण देश मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची वेदना अनुभवत असताना एसव्हीकेएम आणि एनएमआयएमएस सामाजिकदृष्ट्या जबाबदार, हिंसेच्या विरोधात उभे राहाणारे नागरिक आणि अधिक शांततापूर्ण व सर्वसमावेशक भविष्य घडवण्यासाठी बांधील आहे. एसव्हीकेएम आणि एनएमआयएमएस कम्युनिटी या भयंकर हल्ल्याची झळ बसलेल्या प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंबासाठी प्रार्थना करत आहे. आम्ही तुमच्याबरोबर आहोत – दुःखात, आशेत आणि अधिक चांगल्या भविष्याच्या आश्वासनातही.

## भिवंडीत फर्निचरच्या गोडाऊनला भीषण आग, आगीत मोठ्या प्रमाणात वित्त हानी.

**दैनिक युवक आधार**
**ठाणे वार्ताहर**



**ठाणे ता २६ एप्रिल :** भिवंडीत आगीची मोठी घटना घडली आहे. या आगीमुळे चार मजली इमारत कोसळल्याची माहिती समोर येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सदर घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून आगीवर नियंत्रण मिळवण्यास 10 तासांपासून शर्थीने प्रयत्न सुरु आहेत. अग्निशामक दलाच्या जवान आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अतोनात प्रयत्न सुरु आहे. या आगीमुळे चार मजली इमारत कोसळल्याची देखील माहिती मिळत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे प्रसंगावधान साधत पोलिसांनी आगीच्या आजूबाजूचा परिसर रिकामा केला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. भिवंडीतील राहनाळ गावात संबंधित घटना घडली आहे. राहनाळ गावात स्वागत कंपाउंडमधील फर्निचरच्या गोदामाला भीषण आग लागली. या आगीत फर्निचरची 10 ते 15 गोदाम जळून खाक झाली आहेत. घटनास्थळी भिवंडी, ठाणे अग्निशमन दलाच्या तीन ते चार गाड्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी दाखल झाल्या. त्यांच्याकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पण अजूनही आग धुमसलेलीच आहे. आग विझवताना अग्निशामक दलाचा जवान जखमी झाल्याती माहिती आता समोर येत आहे. त्यामुळे या आगीची दाहकता किती भयानक असेल याचा अंदाज आपल्याला येईल.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शांतता कमिटीची बैठक संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**



**शिरूर अनंतपाळ :** तालुक्यातील मौजे-आरी येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी आरी येथील शासकीय जागेवर ध्वज रोवल्या कारणांमुळे तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाला होता. या बाबतीत शिरूर अनंतपाळ पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी नायब तहसीलदार यादव साहेब तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, सामाजिक कार्यकर्ते विशाल गायकवाड, माजी पाणी पुरवठा सभापती सुमितीनंदन दुरूगकर, तलाठी रामलिंग पाटील,बीट जमादार कांबळे यांच्या उपस्थितीत शांतता कमिटीची बैठक घेऊन निर्माण झालेला वाद गावकरी यांच्या उपस्थितीत समन्वयाने मिटवून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आव्हान पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी केले या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे व सामाजिक कार्यकर्ते विशाल गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त करताना संपुर्ण गावाने एक जुटीने राहून गावाचा विकास करावा तसेच समाज सुशिक्षित होण्यासाठी प्रयत्न करावे तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे असे आवाहन केले या वेळी उपसरपंच पवार, पोलिस पाटील, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष तसेच मोठ्या संख्येने

# बीड पंचायत समितीत लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्याच्या वादात शेतकऱ्यांची अडवणूक, जिल्ह्यात ७३५७ कामांवर ८८,७२४ मजुर असताना बीड तालुक्यात केवळ ५० कामांवर २१७ मजुर

### सोमवारी लक्ष्यवेधी आंदोलन करणार :- डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)-** बीड जिल्ह्यातील रोजगार हमी योजना कायम वादग्रस्त असताना सध्या ४३ अंशावर तापमानात तब्बल ८८ हजार मजुर रोजगार हमी वर काम करत असल्याची शासन दरबारी नोंद असुन जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असताना बीड पंचायत समिती मध्ये मात्र लोकप्रतिनिधी आणि पंचायत समिती अधिकारी यांच्या अंतर्गत वादामुळे शेतकऱ्यांची अडवणूक होत असुन रोहयोची अनेक कामे खोळंबून पडली आहेत. घरकुल, गायगोठा, पाणंद रस्ते, विहिरी आदिच्या कामांची मागणी, मंजुरी आणि मस्टर बंद पडल्याने शेतकरी अडचणीत सापडला असुन लोकप्रतिनिधी आणि गटविकास अधिकारी यांच्या अंतर्गत वादामुळे गटविकास अधिकारी कार्यालयात हजर राहत नसल्याचे अडवणूक होत असलेल्या शेतकऱ्यांनी सांगितले. या मुळे गटविकास अधिकारी यांनी कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर राहून शेतकऱ्यांची कामे मार्गी लावावीत या साठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २८ एप्रिल सोमवार रोजी पंचायत समिती कार्यालयात "संगीत खुर्ची" लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे.

**४३ डिग्री तापमानात रोहयो कामांवर ८८ हजारांहून अधिक मजुर, बोगसपणाची चौकशी करा.**

बीड जिल्ह्यातील रोजगार हमी योजना भ्रष्टाचाराचे कुरण असुन नेत्यांचे कार्यकर्ते पोसण्यासाठी मागच्या सरकारच्या काळात कुशल, अकुशलचे निकष धाब्यावर बसवुन थेट मंत्रालयातुन मोठ्या प्रमाणावर कामांना मंजुरी देण्यात आली. या साठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल झाली. नरेगाच्या अहवालानुसार आज घडीला जिल्ह्यात नरेगाची ७,३५७ कामे सुरू असुन त्या वर ८८,७२४ मजुर काम करत असल्याचे दाखविण्यात आलेले आहे. सध्या बीड जिल्ह्याचे तापमान ४३ अंशावर असुन दिवसेंदिवस उच्चांकी पातळी गाठत असताना घराच्या बाहेर पडणं मुश्किल असताना उष्माघातांच्या रूग्णांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून प्रशासनाकडून काळजी घेण्याचे आवाहन केले असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर रोजगार हमी योजनेवर काम करण्याची वेळ आली असेल तर मजुरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल. त्या मुळे नरेगाच्या कामावर खरोखरच इतक्या मोठ्या प्रमाणावर मजुर आहेत का? ८८ हजार मजुरांचा आकडा नेमका दुष्काळाचा कहर आहे की बोगसगिरीचा कहर आहे याची चौकशी करण्यात यावी.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**सामाजिक कार्यकर्ते**

**बीड जिल्ह्यात तालुकानिहाय सुरू असलेली कामे व मजूर पुढील प्रमाणे आहेत.**

केज - कामे १५२२(मजुर १६७३७), गेवराई- १०५६ (१५९३५), पाटोदा- ८९८ (११,३८५),. आष्टी- ७५९(४,५८०), परळी-६६५(११,२२१), अंबेजोगाई- ५८२(७,०७६), शिरूर- ५४४(७,६२०), माजलगाव- ४९७(३,७९८), वडवणी- ४६३(५,३७२), धारूर- ३२१(४,७८६), बीड- ५०(२१७), एकुण- कामे ७३५७(एकुण मजुर- ८८,७२४)

**जिल्ह्यात एकुण ७३५७ कामांवर ८८,७२४ मजुर आणि बीड पंचायत समिती अंतर्गत केवळ ५० कामांवर २१७ मजुर**

बीड जिल्ह्यात रोहयो विभागाच्या दैनंदिन अहवालावरून एकुण ७३५७ कामांवर तब्बल ८८ ,७२४ मजुर सध्याच्या ४३ अंशावर असलेल्या उच्च तापमानात काम करत आहेत. या मध्ये सर्वात जास्त कामे केज तालुक्यात १५२२ कामांवर १६,७३७. रोहयो मजुर आहेत तर बीड जिल्ह्यात सर्वात कमी बीड तालुक्यात केवळ ५० कामे सुरू असुन त्या वर २१७ मजुर आहेत. त्या मुळे एकंदरीतच बीड पंचायत समितीमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांची कामे खोळंबल्याचे निदर्शनास येते. शेतकऱ्यांची अडचण दूर करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# चिपळूण पाग येथील श्री सुकाई देवी मंदिराचा दि. २९ व ३० रोजी कलशारोहण व जीर्णोद्धार सोहळा

### भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण (प्रतिनिधी):--**

- शहरातील पाग येथील श्री सुकाई मंदिराचा कलशारोहण व जीर्णोद्धार सोहोळा आणि कलशाची मिरवणूक शोभायात्रा कार्यक्रम मंगळवार दिनांक २९ ते बुधवार दिनांक ३० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चिपळूण शहरातील पाग येथील सर्व भक्तगणांची नवसाला पावणारी श्री आई सुकाई हे श्रद्धास्थान आहे. मंदिरामध्ये नित्य पूजा अर्चा तसेच सोमवार व मंगळवार सायंकाळी सर्व भक्तगण मिळून आरती करतात. त्यामध्ये स्त्री वर्ग ही समाविष्ट असतो. नित्य दर्शनासाठी मंदिर सकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत खुले असते. या देवीच्या अधिपत्याखाली पाग गोपाळकृष्णवाडी, पाग जोशीआळी, पागमळा तसेच यशोधन नगर पर्यंतचा भाग येतो. पाग विभागातील काही भाग हा श्री देव कालभैरवाच्या सीमेत येतो. पाग विभागातील ग्रामदेवता आई सुकाई देवीचे भव्य देखणे मंदिर आहे. मंदिरामध्ये श्री सुकाई देवी सहदेवता श्री सोळजाई, श्री वाघजाई, श्री काळकाई तसेच श्री शंभू देव यांच्या मूर्ती आहेत. मंदिराचे गाभारे दोन असून दोन्ही गाभाऱ्यांच्या मध्ये असणाऱ्या




जागेत समोरच छोटेखानी गणेश मंदिर आहे. तसेच सभा मंडप एकच असून आत गेल्यावर डाव्या बाजूस गाभाऱ्यात श्री सुकाई देवी तसेच बाजूस श्री शंभू देवाची पिंड आहे. तसेच उजव्या बाजूच्या गाभाऱ्यात श्री सोळजाई, श्री वाघजाई, श्री काळकाई या सहदेवतांच्या पाषाणमूर्ती आहेत. देवीच्या वार्षिक उत्सवामध्ये शिमगोत्सव व नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. या श्री सुकाई देवी मंदिराचा कलशारोहण व जीर्णोद्धार सोहळा आणि कलशाची मिरवणूक शोभा यात्रा कार्यक्रम मंगळवार दिनांक २९ एप्रिल ते बुधवार दिनांक ३० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले आहेत. यानिमित्ताने मंगळवार दिनांक २९ रोजी दुपारी ३.३० वाजता कलश आणणे करता ग्रामदेव जुना कालभैरव मंदिर ते श्री सुकाई मंदिर पर्यंत सवाद्य मिरवणूक. मार्गक्रमण:- श्री जुना कालभैरव मंदिर, शिवाजी चौक, नवीन एसटी स्टँड, पाग पॉवर हाऊस मार्गे श्री सुकाई देवी मंदिर असणार आहे. रात्री ८.३० वाजता श्री सुकाई मंदिरात महाआरती तर रात्री १०.३० वाजता सुगम संगीत मराठी भावगीत व भक्तीगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. बुधवार दिनांक ३० एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता सनई चौघडा, वादन सकाळी ८.३० ते १०.३० वाजता अभिषेक, होम हवन, प्रासाद वास्तू व धार्मिक विधी, सकाळी १०.३० ते ११.३० वाजता कलशारोहण समर्थ भक्त महेश बुवा दातार यांच्या हस्ते होईल. दुपारी ११.३० ते १.३० वाजता मान्यवर, देणगीदार माहेरवासिनी यांचा सन्मान सोहळा व मनोगते होतील. यावेळी आमदार भास्कर जाधव, आमदार शेखर निकम, माजी आमदार सदानंद चव्हाण, माजी आमदार रमेश कदम, वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्सचे चेअरमन प्रशांत यादव, प्रतिष्ठित ग्रामस्थ मधुकर जोशी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ४ वाजता श्री देव सत्यनारायण महापूजा, सायंकाळी ६ वाजता हरिपाठ व किर्तन कीर्तन, कीर्तनकार- ह.भ.प. पप्पू महाराज नाडे (पाटण, जि. सातारा ) मृदुंग मनी- पारस भागडे, विनोद भैरवकर , गायक - सुनील भैरवकर , महेंद्र भैरवकर, प्रमोद भागडे, हरी चांदिवडे हे असतील. तर रात्री १०.३० वाजता 'लावण्यवती अप्सरा' हा करमणुकीचा कार्यक्रम होईल. तरी श्री सुकाई देवी मंदिराच्या कलशारोहण व जीर्णोद्धार सोहळा आणि कलशाची मिरवणूक शोभायात्रा कार्यक्रमाला चिपळूणवासीयांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री सुकाई देवी देवस्थान, ग्रामस्थ मंडळ पाग- चिपळूण तर्फे करण्यात आले आहे.

## केनवड जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षाची निवड

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील केनवड येथील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गजानन दशरथ गोळे यांची निवड करण्यात आली आहे. आज दिनांक २५ एप्रिल रोजी शाळेत पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात ही निवड करण्यात आली. गजानन गोळे हे ग्रामपंचायत केनवडचे सक्रिय सदस्य आहेत. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदासाठी एकूण चार अर्ज आले होते. मात्र, सर्व पालकांनी एकमताने गजानन गोळे यांच्याच नावाची शिफारस केली. सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी असलेली बांधिलकी यामुळे त्यांची निवड निश्चितच उपयुक्त ठरणार आहे, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यांच्या निवडीनंतर पालक, ग्रामस्थ आणि शाळेतील शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमादरम्यान शाळेच्या मुख्याध्यापकांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि अध्यक्ष म्हणून निवड झालेल्या गजानन गोळे यांच्या कार्याचा गौरव करत शाळेच्या प्रगतीसाठी त्यांचे मार्गदर्शन लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शाळा व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष गजानन गोळे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीमध्ये उपाध्यक्ष म्हणून



दिपाली आश्रू गाडे, सदस्यांसाठी शारदा गोळे, आरती सातपुते, दिपाली वाकुडे, माधव ढेंगळे, दत्तराव खराटे, ज्ञानेश्वर गोळे, सुमित वाकुडे, तज्ञ म्हणून अंभोरे सर व शारदा ज्ञानेश्वर गोळे यांची शाळा व्यवस्थापन समितीमध्ये निवड झाल्याने सर्वांनी आनंद व्यक्त केला.यांनीही यावेळी सर्वांनी भावना व्यक्त करत शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्ण प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. शैक्षणिक कार्यामध्ये कोणतीही राजकारण येणार नाही अशी ग्वाही निवड झालेल्या सर्व पालकांनी यावेळी दिली.

# कारंजा (लाड) येथे मा.खा.संजयजी देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त अपंग बंधू-भगिनीसाठी मोफत साधने शिबिर... प्रियाताई महाजन...

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा/ प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

दिनांक 27 एप्रिल 2025 रोजी कांरजा (लाड) येथे सन्माननीय वाशिम यवतमाळचे लोकप्रिय खासदार संजयजी देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अपंग बंधू भगिनींसाठी मोफत साधने शिबिराचे आयोजन केले आहे तरी या शिबिराचा अपंग बंधू आणि भगिनींनो याचा मोठ्या प्रमाणात फायदा घ्यावा असे आव्हान युवा सेना युवती विभागीय सचिव प्रियाताई महाजन यांनी केले आहे. या शिबिरामधे तपासणी खालील प्रकारच्या दिव्यांग व्यक्ती साठी असेल. दिव्यांग प्रकार आणि साहित्य आणि अपंग टक्केवारी खालील प्रमाणे १ .अस्थी व्यंग - तीन चाकी सायकल , व्हील चेअर , काठी , कुबडी, सी. पी. चेअर



किमान ४०% आणि वर दिव्यांग प्रमाणपत् टिप- बैटरी ऑपरेटेड तीन चाकी सायकल साठी किमान ८०% दिव्यांग प्रमाण पत्र आवश्यक ( बहिरा,अंध,मतिमंद नसावा आणि दोन्ही हाथ सुस्थितीत असावे ) अंध प्रवर्ग ( १००% ) - प्राथमिक आणि माध्यमिक विद्यार्थी साठी ब्रेल किट,अंध काठी . इयत्ता १० पासून पुढे शिकत असल्यास स्मार्ट फोन आणि सुगम्य केन ( सेन्सर अंध काठी) शाळेत शिकत असल्याचा पुरावा शाळेचे कॉलेज चे ओळखपत्र किंवा बॉनफाईड आ व श्य क . कर्णबधिर - कानाची मशीन हाथ व पाय नसल्यास कृत्रिम अवयव चे मोजमाप घेऊन नंतर कृत्रिम अवयव बसविण्यात येतील

आवश्यक कागदपत्र ( झेरॉक्स)
१)UDID कार्ड ( आवश्यक) आणि दिव्यांग प्रमाणपत्र
२)आधार कार्ड ३)उत्पन्न दाखला / रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे ( मासिक -२२५००/- रू. किंवा वार्षिक २७००००/- रू. च्या आत )
सूचना - वरील ३ कागदपत्र असल्यावरच तपासणी करण्यात येईल शिबिर मधे राष्ट्रीय व्योश्री अंतर्गत तपासणी ज्येष्ठ नागरिक साठी असेल (60 **वर्ष व 60 वर्षा वरिल). आवश्यक कागदपत्र ( झेरॉक्स)**
१)आधार कार्ड
२)उत्पन्न दाखला / रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे ( मासिक -१५०००/- रू. किंवा वार्षिक १८००००/- रू. च्या आत)
सूचना - वरील २ कागदपत्रे असल्यावरच तपासणी करण्यात येईल.अशी माहिती युवा सेना युवती विभागीय सचिव पश्चिम विदर्भ प्रीयाताई महाजन यांनी दिली आहे.

प्रियाताई महाजन युवा सेना युवती विभागीय सचिव पश्चिम विदर्भ ह्या सन्माननीय वाशिम यवतमाळचे लाडके खासदार संजयजी देशमुख साहेब यांच्या निकटवर्ती मानल्या जातात.त्या सामाजिक कार्यामध्ये नेहमी अग्रेसर असतात प्रियाताई यांच्या कार्याची सन्माननीय खासदार भविष्यात दाखल घेतील अशी चर्चा सर्वसामान्य नागरिकांमध्ये आहे.

# मुलांचे आधार कार्ड अपडेट करणे अनिवार्य.

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी

आधार कार्ड हे भारत सरकार द्वारे जारी केलेले एक बारा अंकी ओळखपत्र आहे. हे कार्ड भारतीय नागरिकांसाठी अद्वितीय असे ओळखपत्र म्हणून कार्य करते. यामध्ये व्यक्तीची माहिती, नाव, पत्ता, जन्मतारीख आणि बायोमेट्रिक डेटा बोटांचे ठसे डोळ्यातील बुबुळ यांचा समावेश असतो. आधार कार्ड हे प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी अत्यंत आवश्यक असे ओळखपत्र आहे .भारत सरकारच्या आदेशानुसार आधार कार्ड ची निर्मिती केली जाते. आधार कार्ड हा भारतातील सर्वात महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी आधार कार्ड आवश्यक आहे.

पाच ते पंधरा वर्षे वयोगटातील मुलांच्या आधार कार्ड अपडेट करणे अनिवार्य आहे. या वयोगटातील बालकांचे वय वाढल्यामुळे चेहरा, बोटांचे ठसे आणि डोळ्यांचे नमुने पुन्हा नोंदवणे आवश्यक आहे, त्यामुळे आधार मधील माहिती अचूक राहते, आणि भविष्यातील शैक्षणिक, आर्थिक सेवा यांचा लाभ घेताना अडथळा येत नाही. मुलांचे आधार बायोमेट्रिक अपडेट




करण्याची पहिलीच वेळ असेल तर त्यासाठी कोणतेही शुल्क लागणार नाही. युआयडीएआय ही सेवा पूर्णपणे मोफत प्रदान करते. जेणेकरून प्रत्येक जण त्याच्या मुलाच्या आधार कार्ड सहजपणे अपडेट करू शकेल ,परंतु जर नंतर कोणती चूक दुरुस्त करण्यासाठी खाते अपडेट करायचे असेल तर नाम मात्र शुल्क भरावे लागतात. तालुक्यातील एकूण लोकसंख्येचा विचार करता अनेक ठिकाणी आधार सेंटर उपलब्ध आहेत. आधार कार्डवर माहिती अपडेट करण्याची संबंधित सेंटर मध्ये सुविधा आहे. मात्र अनेकदा सर्वर डाऊन असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र समोर येत आहे .

पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांच्या आधार कार्ड मध्ये बायोमेट्रिक घेतले जात नाही . मुल पाच वर्षाचे होत असल्याचे फिंगरप्रिंट घेत आधार कार्ड बनवले जाते .आधार कार्ड बनवण्यासाठीची ही प्रक्रिया पूर्णपणे मोफत आहे .परंतु वयाच्या पंधराव्या वर्षी पुन्हा बायोमेट्रिक अपडेट करणे आवश्यक आहे कारण मुलांच्या शरीरासोबतच त्यांचे बायोमेट्रिक देखील बदलत राहतात या अपडेट मध्ये मुलांचे फिंगर प्रिंट आयरिस स्कॅन आणि नवीन फोटो जोडला जातो जेणेकरून आधार कार्ड भविष्यात वैध राहील यासाठी जवळच्या आधार केंद्रात जाऊन तेथे आधार कार्ड अपडेट करता येते. याशिवाय पोस्ट ऑफिस शासकीय कार्यालयातील आधार केंद्रांच्या ठिकाणी आधार अपडेट करता येते. वाढत्या वयामुळे चेहरा बोटांच्या ठशांसह डोळ्यांमध्ये ही बदल होतो त्यामुळे पुढील शैक्षणिक लाभासाठी व आर्थिक सेवा होण्यासाठी लहान मुलांच्या आधार कार्ड अपडेट करणे गरजेचे आहे.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा रोहाची सदिच्छा पर भेट

**दैनिक युवक आधार**
**रोहा/रायगड**

पंचायत समिती कार्यालय रोहा येथे गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे यांचे समवेत सदिच्छापर शाळा, विद्यार्थी व शिक्षकांच्या विविध प्रश्न संदर्भात भेट घेण्यात आली . यावेळी गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे यांचे स्वागत राज्य कार्यकारणी प्रतिनिधी अनिल नागोठकर , रोहा तालुका अध्यक्ष ब्रिजेश बा. भादेकर व सरचिटणीस संजय मा. बागडे , कार्याध्यक्ष विजय तू. वेळे कोकण महिला आघाडी ,विद्या बा रोहेकर , रोहा महिला तालुका आघाडी प्रमुख वैशाली अ. सलागरे व रोहा तालुका कार्यकारणी यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले .यावेळी शाळा विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्न संदर्भात खालील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

*१)उन्हाळी सुट्टीत आयोजित केलेल्या शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे सुरक्षितेबाबत. २) शिक्षण सेवक पद रद्द करण्याबाबत ३)ऑनलाईन व ऑफलाइन वारंवार माहिती न मागवण्याबाबत. ४) अध्यापनाव्यतिरिक्त शिक्षकांकडे असलेली अतिरिक्त कामे काढून घेण्याबाबत. ५) विषय शिक्षक, पदवीधर शिक्षक, पदोन्नती मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी रिक्त पदे भरणेबाबत.६) संच मान्यता मध्ये आधार कार्ड ऐवजी प्रत्यक्ष शाळेची विद्यार्थी पटसंख्या ग्राह्य धरून नवीन संच मान्यता करणेबाबत. ७)सन 2024 ची संच मान्यता जीआर रद्द करण्याबाबत. ८) ऑनलाईन जिल्हाअंतर्गत बदली प्रक्रिया करण्याअगोदर आंतर जिल्हा बदली करून रिक्त पदांची यादी जाहीर करून जिल्हा अंतर्गत ऑनलाईन बदल्या करणे बाबत.९) सातव्या टप्प्यातील शिक्षकांच्या बदलीचे धोरण स्पष्ट करून सातवा टप्पा रद्द करण्याबाबत.१०) वस्ती शाळा व अप्रशिक्षित शिक्षकांची लागल्या पासूनची सलग सेवा ग्राह्य धरून १२ वर्षानंतर देय असलेली चटोपाध्याय, जुनी पेन्शन व इतर पदोन्नतीचा लाभ मिळणे बाबत. ११) शालेय पोषण आहाराचा पुरवठा नियमित व उच्च दर्जाचा होणेबाबत. १२) सन २०२५-२६ च्या पटानुसार मोफत पाठ्य पुस्तक प्राप्त होणेबाबत. १३) शासन निर्णय नुसार शाळा व्यवस्थापन समिती मार्फत मोफत गणवेश खरेदी योजनेची अंमलबजावणी होणेबाबत. १४) मे महिन्यापूर्वी शाळांचे मोठी दुरुस्ती प्रस्ताव मंजूर होणेबाबत. १५) भविष्य निर्वाह निधी ना परतावा प्रस्ताव, वैद्यकीय बिल, शिक्षकांची प्रलंबित विविध प्रकारची बिले, शिक्षण सेवकांचे मानधन, सेवानिवृत्तीपूर्वी किमान सहा महिने अगोदर पेन्शन प्रस्ताव मंजूर होणेबाबत. १६) १ नोव्हेंबर २००५ नंतर रुजू झालेल्या सर्व शिक्षण सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू होणेबाबत. १७) १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात असलेल्या शिक्षकांची GPF खाते उघडून त्यांची NPS व DCPS मधील रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग होण्याबाबत. १८) उर्वरीत सुवर्ण महोत्सव शिष्यवृत्ती रक्कम शाळेचे खात्यात जमा होणेबाबत. १९)हिंदी भाषा सूट प्रस्ताव, स्थायी अ प्रमाणपत्र प्रस्ताव, निवड श्रेणी प्रस्ताव मंजुरी बाबत. २०) ३ वर्षापासून राहिलेला जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा आयोजन करणेबाबत. २१) सन २०१८ पूर्वी व नंतर सर्व शिक्षकांना सर्व जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षकांना एक वाढीव वेतन व फरक रक्कम मिळणेबाबत.*

यावेळी रोहा तालुका शिक्षक नेते संतोष खलापकर ,उपाध्यक्ष दिपक पाबरेकर , किशोर पोळेकर , अरुणा लाड , लीना सुर्वे , मनिषा पाबरेकर , कार्यालयीन चिटणीस संतोष धोत्रे, कोषाध्यक्ष जयेश भोईर , विभाग प्रमुख निवास थळे , दिनेश वाघमारे , प्रसाद पतंगे , कमलाकर लेंडी , प्रसिद्धीप्रमुख संतोष वेटकोळी , तालुका संघटक हरिभाऊ आंधळे , नजान सर, संदीप घोडके , मनोज जाधव, सुरेश राठोड , रोहकले , धर्माधिकारी , महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती रोहा यावेळी उपस्थित होते.

# निफाड महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा

## ग्रंथ हे उत्तम मार्गदर्शक प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे

**दैनिक युवक आधार निफाड**
**प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्र विभागातर्फे आयोजित जागतिक पुस्तक दिन समारंभ प्रसंगी बुधवार (दिनांक २३ एप्रिल )ते बोलत होते. ग्रंथ हे ज्ञान माहिती देत असतात ग्रंथातूनच प्रेरणा मिळत असते विविध आत्मचरित्र चरित्र ऐतिहासिक ग्रंथ विज्ञान विषय ग्रंथ माहिती तंत्रज्ञान या सगळ्याच ज्ञान ग्रंथरूपाने आपल्याला वाचायला मिळते म्हणून आयुष्याला दिशा मिळण्यासाठी ग्रंथ हे एका मार्गदर्शकासारखे काम करीत असतात म्हणून प्रत्येकाने नियमित वाचन केलं पाहिजे असे मत प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर प्रा डॉ प्रवीण ढेपले ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा दिपाली शेंडे,श्री राजेंद्र मत्सागर आदी उपस्थित होते प्राचार्य ज्ञानोबा ढगे पुढे म्हणाले की यावर्षीचा जागतिक ग्रंथ दिनाचा विषय 'रीड युवर वे' म्हणजेच आवडेल ते वाचा याविषयी माहिती देताना, विद्यार्थ्यांनी प्रथमतः वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी वर्तमानपत्रातील छोट्या, मोठ्या बातम्या वाचायला सुरुवात करा, विषय तज्ञ संपादकीय लेख वाचा. मोबाईल च्या




निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आयोजित जागतिक पुस्तक दिननिमित्त ग्रंथ प्रदर्शन प्रसंगी प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे,डॉ प्रवीण ढेपले ग्रंथपाल प्रा दिपाली शेंडे, श्री राजेंद्र मत्सागर डॉ महेश बनकर आणि विद्यार्थी वर्ग

डिजिटल युगात वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्येच निश्चित आहेच, फक्त वाचनाकडे एक पाऊल टाकण्याची कृती व मानसिक तयारी सर्वांनी या निमित्ताने करावी आणि ग्रंथालयीन पुस्तकांचा जास्तीत जास्त उपयोग करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी महाविद्यालय ग्रंथालयात संदर्भ व क्रमिक पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथपाल प्रा दिपाली शेंडे यांनी केले तर आभार राजेंद्र मत्सागर यांनी मानले या वेळी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. बी.बी. मुंतोडे, प्रा श्रद्धा गवळी, डॉ. महेश बनकर, श्री एस. डी. गायकवाड सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



परतूर येथे नव्याने रुजू झालेल्या गटशिक्षणाधिकारी लोंढे मॅडम यांचा सत्कार करताना वंचित बहुजन आघाडीचे नेते रामप्रसाद थोरात सर,वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष गौतम खंडागळे,ढवळे सर व ईतर मान्यवरांचे घेतलेले छायाचित्र.
( अशोक ठोके दैनिक युवक आधार )

# रेवदंड्याच्या ‘रवी चहावाल्या’चा माणुसकीचा गंध ; एका कपात जपलेली आपुलकीची चव!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा हायस्कूलसमोर एक साधीशी चहाची टपरी, पण ती टपरी म्हणजे केवळ चहाचं ठिकाण नाही – ती आहे आपुलकीचा आणि माणुसकीचा एका कपात अनुभव देणारी जागा. ह्या टपरीवर तब्बल १५-२० वर्षांपासून आपल्या खास चहामुळे प्रसिद्ध असलेला रवी चहावाला, गावात ‘दिलदार माणूस’ म्हणून ओळखला जातो. रवी दररोज देवघरहून सायकलवरून सात किलोमीटरचा प्रवास करून टपरीवर येतो. ऊन असो, पाऊस असो किंवा थंडी – त्याचं वेळेवर पोहोचणं कधीच चुकत नाही. त्याचं चहा बनवण्याचं कौशल्य तर वाखाणण्याजोगं आहेच, पण त्याच्या मनाच्या उबदारपणामुळे लोकांना चहात एक वेगळीच चव जाणवते.“मी चहा विकतोय, पण माणुसकीही देतोय,” असं म्हणणारा रवी, कधीही कोणाला चहा नाकारत नाही – अगदी एखाद्याजवळ पैसे नसले तरीही. तो म्हणतो,



“समोरचा माणूस हसून गेला, की मी श्रीमंत झाल्यासारखं वाटतं.”रवीच्या टपरीवरचे अनेक ग्राहक त्याचे कौतुक करतात.स्थानिक ग्राहक समीर आठवले सांगतो, “गावात कितीतरी चहाचे स्टॉल्स आहेत, पण रवीकडे चहा प्यायचं म्हणजे दिवसभरासाठी उर्जा घेणं.” एका हेमा कोळी महिलेचं म्हणणं: “मच्छी विकून दमून गेल्यावर त्याचा गरम चहा आणि हसतमुख चेहरा – हीच तर आमच्यासाठी खरी विश्रांती आहे.” "तर अलीबागहून आलेला ग्राहक प्रशांत म्हात्रे मानी म्हणतोः “इतक्या वर्षांत मी कितीतरी ठिकाणी चहा पिलाय, पण रवीच्या चहात जो आपलेपणाचा स्वाद आहे, तो कुठेच नाही.”रवीने या व्यवसायातून फारसा पैसा कमावलेला नाही. त्याचं घर छोटं आहे, परिस्थिती बेताची आहे. पण त्याच्या चेहऱ्यावर कायम समाधानाचं हसू असतं. तो जे देतो ते फक्त चहा नाही – तो एक अनुभव असतो, माणसातल्या माणुसकीवरचा विश्वास असतो.रवीच्या टपरीला भेट दिली की लक्षात येतं मोठं होण्यासाठी मोठं दुकान लागत नाही, मोठं मन लागतं.

# उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात जागतिक मलेरिया दिन साजरा

## मलेरिया आजाराबाबत सतर्क व जागृत असणे कळाची गरजःडॉ.बाबासो कलेल

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

25 एप्रिल रोजी जागतिक मलेरिया दिनाचे औचित्य साधून उरण येथील इंदिरागांधी ग्रामीण रुग्णालयात जागतिक मलेरिया दिन साजरा करण्यात आला.यावेळी मलेरियाच्या आजाराबाबतविशेष संशोधन करणारे थोर शास्त्रज्ञ तथा संशोधक डॉ. रोनाल्ड रॉस यांच्या प्रतिमेला जेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून त्यांना वंदन करण्यात आले. सदर कार्यक्रमा प्रसंगी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.बाबासो कलेल यांच्या समवेत रुग्णालयातील सर्व डॉक्टर,स्टाप. कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मलेरिया(हिवताप) या आजरा विषयी महिती देताना डॉ.बाबासो कलेल म्हणाले. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता 25



एप्रिल हा जागतिक मलेरिया दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. मलेरिया हा रोग डासांमुळे होत असून, तो या जंतूंनी संक्रमित झालेल्या डासाने चावा घेतला गेल्यास तो पसरतो. डासांच्या शरीरांतील मलेरियाच्या जंतूंच्या घडामोडीविषयी आणि हा मलेरिया मानवी शरीरात कसा संक्रमित होतो याविषयी सर रोनॉल्ड रॉस यांनी मूलभूत संशोधन केले असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले मलेरिया आजारात तापाचा चढ-उतार होत असून विशेषतः थंडी वाजून ताप येतो. ताप थोडा वेळ टिकतो.ताप उतरतण्याच्या वेळेस शरीराला घाम सुटतो हा ताप दिवसा आडयेतो काही केस मध्ये तो नियमितपणे येतो तापाबरोबर डोकेदुखी,- अंगदुखी, कंबरदुखी, थकवा, इत्यादी लक्षणे जाणवतात,यावर कोणते उपचार संक्रमित व्यक्तीचे रक्त तपासल्याखेरीज याचा नक्की निर्णय करणे अवघड असते मलेरियाच्या तापामुळे काही वेळा मेंदूवर परिणाम तो ही शक्यता बालकांमध्ये जास्त प्रमाणात आढळते. याबाबत कोणती काळजी घ्यावी हे सांगताना ते म्हणाले आज मलेरियारोगावर अनेक औषधे उपलब्ध असून मलेरियावरील उपचारात मुख्यतः क्लोरोक्विन, प्रायमाक्विन,क्वीनाईन, आर्टिमिसिन ही औषधे प्रामुख्याने वापरली जातात.मात्र मलेरियाच्या तीव्रतेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने त्यचा वापर करावा कुणीही अंगावर ताप काढू नये वरील लक्षणे आढळून येत असल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे. डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे नष्ट करून मलेरियावर बरेच नियंत्रण मिळवता येते. साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होते, अशा साचलेल्या पाण्याची जागा झाकून ठेवावी, डास मानवी रक्त शोषल्यानंतर भिंतीवर बसून ते राहतात अशा परिस्थितीत भिंतींवर कीटकनाशकांची फवारणी यामध्ये डीडीटी व्यतिरिक्त परमेथ्रिन आणि डेल्टामेथ्रिन सारख्या औषधांचा समावेश आहे, मलेरियाविरूद्ध प्रभावी लस विकसित केली जात आहे.परंतु यादिना निमित्ताने प्रत्येक नागरिकाने मलेरिया आजाराबाबत सतर्क व जागृत असणे ही आज कळाची गरज असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

# कासार शिरंबे येथील छत्रपती संभाजीराजे कुस्ती संकुलमध्ये घडतेय पैलवानांची फौंज




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

कराड तालुका पैलवानांचा तालुका म्हणुनओळखला जातो.खाशाबा जाधव हे एक भारतीय फ्रीस्टाइल कुस्तीपटू होते. हेलसिंकी येथील १९५२ मधील उन्हाळी ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक जिंकण्यासाठी ते प्रसिद्ध होते. ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक जिंकणारे ते स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. तर अकोला येथे १९९४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत कराड तालुक्यातील आटके गावचे सुपुत्र कै. संजय पाटील यांनी महाराष्ट्र केसरी किताब जिंकून कराड तालुक्यात मानाचा तुरा रोवला होता.

कासार शिरंबे ता. कराड येथे छत्रपती संभाजीराजे कुस्ती संकुल गेली ७ वर्षे पैलवानांची फौज घडवण्याचे काम पैलवान संभाजी कळसे व माणिकराव पाटील करत आहेत.अथक परिश्रम घेऊन पैलवान घाडीवण्याचे काम करत आहेत.

या संकुला मध्ये दरवर्षी उन्हाळी शिबीर भरवले जाते. या वर्षी २८ एप्रिल ते २३ मे पर्यंत शिबीर भरवण्यात आले आहे. यामध्ये राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली जाते. पहाटे ४ वाजल्यापासून व्यायाम स सुरवात केली जाते. त्यानंतर पैलवानांची अंघोळ, नाष्टा ,जेवण तसेच दुपारी आराम ४ वाजल्यापासून कुस्तीचा सराव व सायंकाळी जेवण असा दिनक्रम चालतो. उन्हळी सुट्टी लागली की बरेच पालक आपल्या पाल्याला कुस्ती संकुलात पाठवत असतात. त्यामुळे मुलांची शरीरयष्टी योग्य वयात बनली जात आहे.छोटे पैलवान आज ना उद्या छत्रपती संभाजीराजे कुस्ती संकुल व गावचे नाव नक्की उज्वल करतील हे नाकी!

# रात्रीच्या काळोखात ६८ कासवांच्या पिल्लांचा समुद्राकडे प्रवास

■ ५२ दिवसांनी पिल्ले अंड्यातून बाहेर
■ ६० पिल्ले बाहेर येण्याची प्रतीक्षा

**धनंजय कवठेकर / अलिबाग**

किहिम समुद्रकिनारी ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवाची ६८ पिल्लांचा रात्रीच्या अंधारात समुद्राकडे प्रवास सुरू झाल्याचे मनमोहक चित्र पहावयास मिळाले. अखेर तो दिवस क्षण जवळ आल्यानंतर या क्षणाचा आनंद किहिम ग्रामस्थांनी जल्लोष करीत साजरा केला. मागील अनेक वर्षांपासून ऑलिव्ह रिडले जातीची कासव मुंबई आणि अलिबागच्या समुद्रकिनारी नाहीशी होत असल्याची चर्चा होती, मात्र आजच्या घटनेने येथील पर्यावरणात रक्षण करण्याची क्षमता असल्याचे दिसून आले.



मागील ५२ दिवस किहिम ग्रामस्थ आणि वनविभागाचे कर्मचारी दिवसरात्र या घरट्यांचे रक्षण करीत होते आणि तो क्षण शुक्रवारी सायंकाळी ५.०० वाजता जवळ आला, याच दरम्यान घरट्यात हालचाल होत असल्याचे रक्षकाच्या लक्षात आले. त्यानंतर एकएक पिल्लू घरट्यातून बाहेर पडण्यास सुरुवात झाली. ८.०० वाजेपर्यंत ६८ पिल्ले बाहेर आली होती, या सर्वांना किहिमचे सरपंच प्रसाद (पिंट्या) गायकवाड, दक्षिण कोकण विभागीय वनअधिकारी कांचन पवार, कांदळवन कक्षाचे वनक्षेत्रपाल समिर शिंदे यांच्या हस्ते समुद्रात किहीम समुद्र समुद्रात सोडण्यात आले. अद्याप साधारण ६० पिल्ले बाहेर येण्याची शक्यता आहे. या पिल्लांचे स्वागत मोठ्या उत्साहात केले जाईल, असे किहिम ग्रामपंचायत सरपंच प्रसाद (पिंट्या) गायकवाड यांनी सांगितले. येथील समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छता ठेवण्यात यश येत असल्याचे हे उदाहरण असल्याचे म्हटले जात आहे.

> समुद्रकिनारा स्वच्छ ठेवण्यात यश येत असल्याने ऑलिव्ह रिडले जातीचे कासव येथे पुन्हा घरटी करू लागली आहेत. पूर्वी या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात झाडी होती, केतकीची जंगले होती, ती नाहीशी झाल्याने या घरट्यांमध्ये खंड पडलेला असवा. परंतु सर्वांच्या प्रयत्नाने हे दिवस परत आलेले आहेत.
> - **प्रसाद गायकवाड**, सरपंच- किहीम ग्रामपंचायत

एकेकाळी अलिबागच्या समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात ऑलिव्ह रिडले जातीची कासव अंडी घालण्यासाठी येत असत, परंतु वाढत्या प्रदूषणामुळे यात पूर्णपणे खंड पडल्याचे त्यांनी सांगितले. ३ मार्च रोजी दुपारी एका ऑलिव्ह रिडले जातीची मादी अंडी घालत असल्याचे येथील नागरिकांच्या लक्षात आले होते. अंडी घातल्यानंतर मादी कासव समुद्रात निघून गेले. या अंड्यांचे योग्य पद्धतीने जतन करण्यासाठी कांदळवन कक्षाने उपाययोजना आखत २४ तास पहारा ठेवला होता.

> पिल्ले बाहेर पडताना घरट्यातील वाळू थोडीशी खचत असल्याचे पाहिल्यानंतर पिल्ले बाहेर येण्याची वेळ जवळ आल्याचे आमच्या लक्षात आले. त्यानंतर ओहोटीची योग्य वेळ आणि तापमानाचा योग्य अंदाज घेत ही पिल्ले बाहेर आली होती. साधारण १२० पेक्षा जास्त अंडी एका मादीने घातलेली असावीत, त्यामुळे अद्याप साधारण ६० पिल्ले शनिवारी सकाळी बाहेर येऊ शकतात. किहिम ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्यामुळे हे सर्व शक्य होत आहे. अंडी घातल्यानंतर मादी कासव समुद्रात निघून गेले होते.
> - **समीर शिंदे**, वनक्षेत्रपाल, कांदळवन कक्ष अलिबाग

## निवडक

### प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारपासून आंदोलन

**उरण :** उरण सिडको प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारपासून सिडको भवन येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे रायगड जिल्हा सचिव रामचंद्र म्हात्रे यांनी दिली आहे. या आंदोलनात प्रामुख्याने सरकारने भूमिपुत्रांची गरजेपोटी बांधकामे (घरे) नियमित करण्याचाही निर्णय घेतला आहे. असे असतानाही सिडकोकडून या बांधकामांवर तोडक कारवाई केली जात आहे. ती त्वरित थांबवून प्रथम सिडकोने प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडवावेत, ही प्रमुख मागणी करण्यात आली आहे. चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतरही उरणमधील द्रोणागिरी नोडचे ४०० पेक्षा अधिक सिडको प्रकल्पग्रस्त साडेबारा टक्के भूखंडांपासून वंचित आहेत. विविध मागण्यांसाठी होणारे हे बेमुदत धरणे आंदोलन सीआयटीयू, अखिल भारतीय किसान सभा, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, डी.वाय.एफ.आय. संघटनाच्या वतीने करण्यात येणार आहे.

### श्री संत गोरा कुंभार पुण्यतिथी उत्सव साजरा

**भिवंडी :** शहरातील कुंभारआळी येथील श्री गोरा कुंभार संस्थानच्या वतीने शनिवारी सकाळपासून श्री संत शिरोमणी गोरा कुंभार यांचा पुण्यतिथी उत्सव साजरा साजरा करण्यात आला. या उत्सवात स्थानिक कुंभार समाजासह परिसरातील संत व भाविक मंडळी उत्साहाने सहभागी झाली होती. शहरातील कुंभारआळी येथे श्री गोरा कुंभार संस्थानची जागा असून तेथे श्री संत शिरोमणी गोरा कुंभार आणि विठ्ठल-रखुमाई यांचे मंदिर प्रस्तावित आहे. याच जागेवर दरवर्षी चैत्र कृष्ण त्रयोदशी रोजी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून संत गोरा कुंभार यांची पुण्यतिथी साजरी करण्यात येते. त्यानुसार यावर्षी शनिवारी सकाळी ६ वाजता नामदेव मंदिर भजनी मंडळ यांच्या मार्गदर्शनाने प्रतिमेचे पूजन आणि काकड आरती करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

### मुरूडमध्ये पदवीप्रदान सोहळा उत्साहात

**मुरूड-जंजिरा :** अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड-जंजिरा येथे शनिवारी पदवीप्रदान समारंभ व वार्षिक बक्षीस वितरण समारंभ उत्साहात महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंजुमन इस्लाम जंजिरा हलका मजलिस मुरूडचे अध्यक्ष तसेच अंजुमन इस्लाम जंजिराचे उपाध्यक्ष अझीम हमिद खानजादा हे होते. कार्यक्रमादरम्यान ४० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. एकूण ७० विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करण्यात आले तसेच १५० हून अधिक विद्यार्थ्यांना सांस्कृतिक व क्रीडा विभागाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# क्लस्टर डेव्हलपमेंटविरोधात जितेंद्र आव्हाडांचे रणशिंग

**जनमत विरोधात असताना क्लस्टरचा हट्ट कशासाठी - डॉ. आव्हाड**




छाया : दीपक कुरकुंडे

### घरावर आलात तर शिंगावर घेऊन भिरकावू

गोरगरीबांच्या रागाची परीक्षा घेऊ नका. आता ही जबरदस्ती सहन केली जाणार नाही. घरावर आलात तर शिंगावर घेऊन भिरकावून देऊ. क्लस्टर योजनाच बिल्डरधार्जिणी आहे. ती आम्ही उधळून लावणारच आहोत. पण, मानपाड्यात पडलेली ही ठिणगी आता शहरभर पसरणार आहे. बायोमेट्रिक सर्वेक्षण तत्काळ बंद करा.

### नोंदणी क्रमांक पुसले

रहिवाशांना संबोधताना डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी घरावर टाकलेले क्रमांक पुसून टाकण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ. आव्हाड यांनीच पुढाकार घेऊन घरांवर लिहिलेले क्रमांक पांढऱ्या रंगाने पुसून टाकले. त्यानंतर अनेक रहिवाशांनी आपल्या घरावरील क्रमांक पुसले.



**ठाणे :** मानपाडा, आझादनगर, मनोरमा नगर येथील प्रस्तावित क्लस्टर डेव्हलपमेंटला स्थानिकांकडून प्रचंड विरोध होऊ लागला आहे. येथील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आ. डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली रणशिंग फुंकले असून आपल्या घरांवर टाकलेले नोंदणी क्रमांक पांढऱ्या रंगाने पुसण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, जनमताचा आदर करणे लोकशाहीत अभिप्रेत असतानाही लोकांचा विरोध असतानाही कशासाठी क्लस्टरचा हट्ट धरत आहात, असा सवाल डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला आहे.

मानपाडा, मनोरमा नगर, आझादनगर आदी परिसरात ठाणे महानगर पालिकेकडून क्लस्टर डेव्हलपमेंट (समूह विकास) योजना राबविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. स्थानिक नागरिकांचा विरोध असतानाही ही योजना राबविण्यात येत असून जानेवारी महिन्यात येथील शाळांवर हातोडा चालविण्यात आला होता. प्रशासनाकडे विरोध नोंदवूनही क्लस्टरसाठी जबरदस्ती केली जात असल्याने डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी शनिवारी मानपाड्याला भेट दिली. या प्रसंगी हजारो रहिवासी उपस्थित होते. "आमची घरे वाचविण्यासाठी आम्हाला साह्य करा", अशी विनंती स्थानिकांनी डॉ. आव्हाड यांना केली. त्यावर डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी गोरगरिबांच्या लढ्यात आपण नेहमीच पुढे असतो, असे सांगितले.

डॉ. आव्हाड म्हणाले, ठाणे महानगरपालिकेचे काम जनतेला नागरी सुविधा पुरवण्याचे आहे. पण, इथे बिल्डर्सची धनसंपत्ती वाढविण्यातच ठामपा अधिकाऱ्यांना अधिक स्वारस्य आहे. जानेवारी महिन्यात जर शाळा तोडल्या जात असतील तर पैशापुढे माणुसकी हरत असल्याचेच दिसत आहे. तुम्ही मत देताना विचार केला नाही, ज्यांना मत देऊन विजयी केले तेच आता तुमच्या डोक्यावरचे छतच हटवत नाहीत तर तुमच्या नरडीवर पाय देत आहेत. आपल्याकडे रस्ता नाही, पाणी नाही, यावर आपण प्रश्न विचारत नाही. पण, अधिकाऱ्यांसमोर आपण शरणागती पत्करतोय. आता शरणागती पत्करायची नाही. ऊन-पावसात मी तुमच्यासाठी लढायला सज्ज आहे. पण, तुम्ही देखील लढायला हवे ना! जर प्रत्येक घरातून फक्त एक माणूस रस्त्यावर उतरला ना, तर कुणाच्या बापाची हिंमत नाही आपल्याला घराबाहेर काढायची. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, रचना वैद्य, एकनाथ जाधव आदी उपस्थित होते.

# भिवंडीत फर्निचरच्या गोदामाला भीषण आग

■ आगीत १२ गोदामे जळून खाक
■ अग्निशमन दलाचा कर्मचारी गंभीर

**भिवंडी :** भिवंडीत आगीच्या घटनांचे सत्र सुरू असतानाच तालुक्यातील राहनाळ गावच्या हद्दीतील एका मोठ्या प्रमाणात फर्निचर साठवलेल्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली असून या आगीत संपूर्ण इमारतीतील १२ गोदामे जळून खाक झाली. या आगीत सुदैवाने फक्त वित्तहानी झाली असून जीवितहानी टळली आहे. परंतु सदरची भीषण आग आटोक्यात आणत असताना भिवंडी अग्निशमन दलाचा एक कर्मचारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

या आगीबाबत मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडीतील राहनाळ गावच्या हद्दीतील स्वागत कंपाऊंडमधील फर्निचरच्या गोदामाला शनिवारी पहाटेच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. ही आग इतकी भीषण होती की, पाहता पाहता इमारतीतील आजूबाजूची १२ गोदामे आगीच्या भक्ष्यस्थानी पडून फर्निचरची संपूर्ण इमारत जळून खाक झाली. तर आगीच्या घटनेची माहिती मिळताच भिवंडी अग्निशमन दलाच्या २ गाड्या आणि कल्याण व ठाणे अग्निशमन दलाची प्रत्येकी १ गाडी अशा ४ गाड्या घटनास्थळी दाखल करण्यात आल्याची माहिती भिवंडी अग्निशमन दलाने दिली असून अग्निशमन दलाच्या जवानांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठीचे प्रयत्न पहाटे पासूनच सुरू होते. त्यानंतर धगधगत्या आगीत धुराचे लोट आकाशात पसरले होते. परंतु अग्निशमन पथकाने घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन जवानांचे शर्थीचे प्रयत्न केले. दुपारच्या सुमारास भिवंडी अग्निशमन दलातील एक कर्मचारी गंभीर जखमी झाला असून त्यास उपचारासाठी इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली आहे. हरिश्चंद्र वाघ (५४) असे अग्निशमन कर्मचाऱ्याचे नाव असून त्याचे दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले असून त्याच्यावर इंदिरा गांधी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे समजते.




### आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ९ ते १० तासांचा अवधी

आगीमध्ये फर्निचरची पूर्ण इमारत भक्ष्यस्थानी पडल्याने तीन मजली इमारतीच्या गोदामाच्या भिंतीही कोसळण्यास सुरुवात होउन हळूहळू संपूर्ण इमारत अग्निमय होत कोसळली. परंतु सुदैवाने या भीषण आगीच्या घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही. मात्र फर्निचर जळून खाक झाल्याने लाखोंचे नुकसान झाले असून या आगीचे कारण अजूनही स्पष्ट झालेले नाही. भीषण स्वरूपात लागलेल्या या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ९ ते १० तासांचा अवधी लागणार असल्याची माहितीही अग्निशमन दलाकडून देण्यात आली आहे.

# खासगी बसच्या अपघातात आठ वर्षांच्या मुलीचा मृत्यू


**१२ जखमी**



**भिवंडी :** पडघानजीकच्या खडवली नदीवर पिकनिकसाठी खासगी बसने गेलेल्या नागरिकांच्या बसला पडघा-वडपाजवळ शुक्रवारी रात्री उड्डाणपुलाच्या पिलरला बस धडकल्याने झालेल्या अपघातात एका आठ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला असून बसमधील १२ प्रवासी जखमी झाले आहेत. ज्यातील एकाची प्रकृती गंभीर असल्याने त्यास पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. शहरातील गैबी नगर, फंडोले नगर परिसरातील नागरिक खासगी बसने पडघानजीकच्या खडवली नदीवर पिकनिकसाठी गेले होते. सायंकाळी पिकनिकहून परत येत असताना बसचालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने मुंबई-नाशिक महामार्गावरील वडपा पडघाजवळील उड्डाणपुलाच्या पिलरला बस धडकली. या धडकेत आठ वर्षांच्या कायनात अन्सारी या चिमुरडीचा मृत्यू झाला असून तरन्नुम अन्सारी, वकार अन्सारी, तसबिया, नजमा अन्सारी, खुशी अन्सारी, शमा परवीन, काफिया अन्सारी, नमिरा, केहकशा व बदरुद्दीन अन्सारी या जखमी झाल्या आहेत.

त्यापैकी बदरुद्दीन अन्सारी यास पुढील उपचारासाठी ठाणे जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींना शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी उपजिल्हा रुग्णालयात जखमींची भेट घेऊन अपघाता संदर्भात माहिती घेतली व जखमींना योग्य व आवश्यक त्या आरोग्य सुविधा तत्काळ देण्याच्या सूचना वैद्यकीय अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

## नवीन ठाणे जिल्हा व सत्र न्यायालय





ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नूतन इमारतीचे अनावरण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले.
(छाया : दीपक कुरकुंडे)

# नव्या शैक्षणिक धोरणाने उद्योग क्षेत्राला पाठबळ मिळणार : मंगल प्रभात लोढा

### ठाण्यात शिक्षण परिषदेत नवीन धोरणाला पाठिंबा

**ठाणे :** ब्रिटिशांनी पारंपारिक भारतीय शिक्षण परंपरा उद्ध्वस्त करून येथील कौशल्य नष्ट केले. त्यामुळे भारतीयांची उद्योग करण्याची मानसिकता संपली. नवे शैक्षणिक धोरण हे उद्योग क्षेत्राला पाठबळ देणारे ठरणार असून नवीन उद्योजक निर्माण करणारे असणार आहे, असा विश्वास उद्योजक, मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला. ठाण्यात शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या शिक्षण परिषदेत नवीन शैक्षणिक धोरणाला सर्वानुमते पाठींबा देण्यात आला.

विद्याभारती कोकण प्रांत आणि श्री मावळी मंडळ, ठाणे आयोजित महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण आराखडा, नवीन शिक्षण धोरण या विषयावर शनिवारी मावळी मंडळाच्या सभागृहात आयोजित केलेला शिक्षण परिषदेचा समारोप लोढा यांच्या उपस्थितीत करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, अशा प्रकारची परिषद शैक्षणिक धोरण राबवण्याकरता उपयुक्त ठरते. शैक्षणिक धोरण शिक्षकांच्या पुढाकारावर अवलंबून असते. जगाच्या पाठीवर भारतीय विद्यार्थी चमकावे या दृष्टिकोनातून नवे शिक्षण धोरण राबवले जाणार आहे. तब्बल सहा वर्षे या धोरणावर अभ्यास करण्यात आला आणि आता त्याची अंमलबजावणी होत आहे. या धोरणामुळे उद्योजकता विकासालाही चालना मिळणार असल्याचे ते म्हणाले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे भारताच्या भावी पिढ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी प्रभावी ठरू शकते. त्यामुळे हे धोरण प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा जो अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आला आहे, त्यास परिषद पूर्ण पाठिंबा देत असल्याचे यावेळी जाहिर करण्यात आले. या परिषदेला आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे, राष्ट्रीय सुकाणू समिती सदस्य शेषाद्री डांगे, संघाचे कोकण प्रांत कार्यवाह, शिक्षक, मुख्याध्यापक उत्तम कांबळे, विद्या भारती कोकण प्रांत मंत्री, मुख्याध्यापक संतोष भणगे, मावळी मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष सुधाकर मोरे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. नरेंद्र पाठक, विद्या भारती कोकण प्रांतचे प्रदीप पराडकर यादी उपस्थित होते.



**२८ एप्रिलपर्यंत भारतातून बाहेर पडण्याचे आदेश**

# शॉर्ट टर्म व्हिसावर १७ पाकिस्तानी उल्हासनगरात

**उल्हासनगर :** देशभरात जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी सतर्कता वाढवली असताना, उल्हासनगर शहरातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. उल्हासनगरमध्ये १७ पाकिस्तानी नागरिक शॉर्ट टर्म व्हिसावर वास्तव्यास असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने युद्धपातळीवर हालचाली करत या नागरिकांना २८ एप्रिलपर्यंत भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या शोध मोहिमेदरम्यान हा प्रकार उघडकीस आला असून, शहरातील सुरक्षा व्यवस्थेला नवे आव्हान निर्माण झाले आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये नुकत्याच झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, देशभरात सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. याच अनुषंगाने उल्हासनगर परिमंडळ ४ चे पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगर, विठ्ठलवाडी, अंबरनाथ आणि बदलापूर या चारही शहरांमध्ये पोलिसांनी विशेष शोधमोहीम राबवली. तपासणी दरम्यान फक्त उल्हासनगर शहरातच १७ पाकिस्तानी नागरिक शॉर्ट टर्म व्हिसावर वास्तव्यास असल्याचे समोर आले आहे. त्यापैकी काहींच्या वास्तव्यात अनियमितता असल्याचेही निष्पन्न झाले आहे. यामुळे प्रशासनाने तातडीने पावले उचलत सर्व १७ नागरिकांना २८ एप्रिलपर्यंत भारतातून परत जाण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

> देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही. उल्हासनगरात १७ पाकिस्तानी नागरिक शॉर्ट टर्म व्हिसावर वास्तव्यास असल्याचे आढळल्यावर तातडीने कठोर पावले उचलण्यात आली आहेत. संबंधित सर्व नागरिकांना २८ एप्रिलपर्यंत देश सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कोणतीही संशयास्पद हालचाल वा व्हिसा अटींचा भंग केल्यास कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी आपल्या परिसरात संशयित हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, जेणेकरून शहराची शांतता आणि सुरक्षितता अबाधित राहील.
> - **सचिन गोरे**, पोलीस उपायुक्त, उल्हासनगर परिमंडळ ४



अंबरनाथ आणि बदलापूरमध्ये तपासणी केली असता, कोणताही पाकिस्तानी नागरिक आढळून आलेला नाही. मात्र उल्हासनगरमध्ये एकाच वेळी मोठ्या संख्येने पाकिस्तानी नागरिक राहत असल्याचे समजताच, सुरक्षा यंत्रणांनी सतर्कता वाढवली आहे. पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, "शॉर्ट टर्म व्हिसावर आलेल्या नागरिकांनी ठरलेल्या मुदतीमध्ये परत जाणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल." तसेच उल्हासनगर शहरात कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलीस विभागाने कडेकोट बंदोबस्त वाढवला आहे. याशिवाय पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरात कोणतीही संशयास्पद व्यक्ती आढळल्यास किंवा वावरताना काही शंका आल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, जेणेकरून सुरक्षेला कोणतीही बाधा पोहोचणार नाही. सध्या उल्हासनगर शहरात याप्रकरणी कमालीची सतर्कता बाळगली जात असून, पोलीस यंत्रणा दिवस-रात्र 'अलर्ट मोड'वर कार्यरत आहे.